# दिनांक 19.01.2021 रोजी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक 19.01.2021 रोजी महाव्यवस्थापक, यांचे अध्यक्षतेखाली कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली येथे दुपारी 3.00 वाजता जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा घेण्यात आली. सभेत खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते.

१) श्री स्वप्नील आर.राठोड, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.

२) श्री भा.आ. ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, गडचिरोली .

३) श्री नेल्सन बास्की, प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बँक व्यवथापक, बँक ऑफ इंडिया,गडचिरोली.

४) रेणुका राजाराम निकुरे, कर सहाय्यक (प्रतिनिधी) जिल्हा वस्तु सेवा कर अधिकारी, गडचिरोली .

५) श्री अतुल बोमनवार, मे.अष्टभुजा केमीकल्स,इंडस्ट्रिज, MIDC गडचिरोली.

६) श्री अतुल एस.पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.

सभेचे सुरुवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी शासन निर्णय दिनांक १९/१०/२०२० नुसार जिल्हा निर्यात प्रचलन समिती गठीत करण्याचे उद्येश विषयी प्रस्तावना केली. व लगेच मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने श्री पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.

श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी गडचिरोली जिल्हयातील उत्पादन होणा-या राईस मिलबाबतची चर्चा केली. त्यामध्ये ब्लॅक राईस यास प्राधान्य दिले व हा राईस सिरोंचा व एटापल्ली तालुक्यात उत्पादन होत आहे असे सांगीतले. व त्याला ब्लॅक राईस हे नाव बदलवून त्याला रॉयल राईस हे नाव देण्यात यावे. असे सभेत सुचविले. सदर उत्पादनाचे विक्री व विपणन उपलब्ध झाल्यास बियाणे उत्पादन व प्रत्यक्ष उत्पादनाची जबाबदारी कृषि विभाग घेईल व त्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये प्रस्ताव सादर करु असे सांगीतले.

तसेच या जिल्हयामध्ये मोहफुल हे जास्त् प्रमाणात उपलब्ध होतो, त्यामुळे मोहफुलावरुन एखादा वाईन उद्योग उभा करु शकता येईल, कारण डॉ. लेले यांनी हे काम केले आहे व या उद्योगाची प्रकल्प किंमत रु. 25.00 लाखापर्यंत आहे व 50 ते 60 किलो मोहा फुलामध्ये जवळपास 60000 लिटर वाईन तयार होते. या जिल्हयात जवळपास रु.300 ते 350 कोटी किंमतीचे कृषि क्षेत्रामध्ये मोह उत्पादन होते व

// 2 //

रु.1000 कोटी चे वर वनक्षेत्रामध्ये होते असे श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी म्हटले असता त्यावर उद्योजक श्री अतुल बोमनवार यांनी या उद्योगाला सहमती दर्शविली पण या जिल्हयामध्ये दारुबंदी असल्याने याला परवानगी मिळणार नाही. असे त्यांनी सांगीतले असता त्यावर श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी त्याला फक्त वाईन उत्पादन प्रोडक्शन (Manufacture) करण्यात यावे, व नंतर तो माल Direct Export करायचा अशा सुचना केल्या परंतु त्याला सुध्दा परवागनी मिळणार नाही असे उद्योजक श्री बोमनवार यांनी सांगीतले. या उद्योगाला जर परवानगी मिळाली तर येथील शेतक-यांना सुध्दा फायदा होईल. यावर श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी मा.जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे चर्चा करु असे सभेत सांगीतले.

जवस उत्पादन होऊ शकते त्याचे आरोग्य विषयक अनेक फायदे आहेत. त्याचे रोपापासून धागे प्राप्त होतात त्याचाही उपयोग होतो. तसेच या जिल्हयात चारोळी सुध्दा भरपूर प्रमाणात उत्पादन होते, यावर सुध्दा एखादा उद्योग उभारु शकतो असे श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी सभेत सांगीतले.

तसेच श्री ब-हाटे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांनी हा जिल्हा वनव्याप्त जिल्हा असल्याने यावर सुध्दा अनेक प्रकारचे वनउपज आधारित उद्योग या जिल्हयात उभारु शकता येईल, असे सांगीतले.

शेवटी मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने श्री पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी उपस्थित अधिकारी व मान्यवरांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

SD/-

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,गडचिरोली.